# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांकः- ३१/०१/२०१८

आज दिनांक ३१/०१/२०१८ रोजी मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख साो. यांच्या हस्ते नियत वयोमानाने पोलीस दलातून निवृत्त होत असलेल्या ४ सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचा गौरव करण्यात आला. स.फौ./१४० हिरामन वक्टुजी धानोरकर, स.फौ/६५२ हीराजी भास्कर बेहरे, स.फौ./५२३ धनराज लटारी झाडे, स.फौ/१२५ जागोराव विस्तारी इंदुरकर हे आज पोलीस दलातून सेवा निवृत्त झाले. या निमित्ताने त्यांचा संत्कारसमारंभ आयोजित करण्यात आला होता.

मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख साो. यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा शाल श्रीफळ व गडचिरोली पोलीस दलातर्फे भेट वस्तु देवुन सत्कार केला. यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी हे कुंटुबियांसमवेत कार्यक्रमांस उपस्थित होते.

हिरामन धानोरकर, धनराज झाडे, जागोराव इंदुरकर हे १९८४ पासून व हिराजी बेहरे हे १९८६ पासून पोलीस दलात आपली सेवा अविरतपणे बजावत आहेत. पोलीस दलातील खडतर सेवेसाठी धनराज झाडे यांना राष्ट्रपती पदक, पोलीस महासंचालकांचे सेवा पदक प्राप्त असून महत्वाची व विशेष बाब म्हणजे त्यांनी तब्बल २१ मा. पोलीस अधिक्षक साो. गडचिरोली यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले आहे.

या कार्यक्रमानिमित्त मनोगत व्यक्त करतांना हिराजी बेहरे यांनी पोलीस दलाविषयी आपल्या मनात असलेल्या भावना व आदर बोलुन दाखविला. तर धनराज झाडे यांनी १९९२ मध्ये पोलीस व माओवादी यांच्यात झालेल्या चकमकी दरम्यानच्या आठवणीना उजाळा देत आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख साो. यांनी हे चारही जण गडचिरोली जिल्हयाच्या स्थापनेपासूनच या गडचिरोली जिल्हापोलीस दलात कर्तव्य निभावत आहेत. यामुळे ते गडचिरोली पोलीस दलाचा इतिहास चांगल्या प्रकारे जाणतात. इतिहास घडविण्यात महत्वाची भुमिका पार पाडल्याचे त्यांनी सांगितले आणि सर्वांना सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मा. अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) डॉ. महेश्वर रेड्डी साो. तसेच अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.


GADCHIROLI PO
FORTUNE FAVOURS


GADCHIROLI POL
वीर भोग्या वसुंधरा
FORTUNE FAVOURS


GADCHIROLI
वीर भोग्या वसुंधरा
FORTUNE


GADCHIROLI POLICE
वीर भोग्या वसुंधरा
THE BRAVE